रिकामे टोनर विक्री **करणेबाबत जाहीर नोटीस**

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांना पुरविणेत येणारे प्रिंटरमधील ६९८ टोनर हे योग्य कार्यपध्दती व नियमांनुसार विल्हेवाट लावणेबाबतचे निर्देश मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून झालेले माहे मार्च, २०२४ चे तपासणीमध्ये देणेत आलेले आहेत. तरी रिकामे टोनर घेणेसाठी नोंदणीकृत तसेच इच्छूक सेवाधारकांकडून ही जाहिरात प्रसिध्द झालेपासून ते दि. २४/०८/२०२६ इ. रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद निविदा मागणविणेत येत आहेत याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

हुकूमावरुन,

सहा. अधिक्षक(वित्त),

दिनांक – १९/०८/२०२६. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

रिकामे टोनर घेणे करीताच्या नियम व अटी खालीलप्रमाणे

०१	रिकामे टोनर खरेदी करणेकरीता येणारा खर्च निविदेमध्ये भरावा. नंतर वेगळा आकार/शुल्क दिले जाणार नाही.
०२	सदरहू निविदा पाठविताना निविदाधारकांनी त्यासोबत आपला पॅन कार्ड क्रमांक, जी.एस.टी. प्रमाणपत्र, उद्योग आधार प्रमाणपत्र व अधिकृतता प्रमाणपत्र (Authorisation Certificate) जोडावे.
	टोनर कार्टिज हा सामान्य भंगार माल नसून ई-कचरा अंतर्गत येत असल्यामुळे प्रमाणित ई-कचरा (E-waste) संकलन केंद्र (E-waste Dismantler/Recycler) असण्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
०३	महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.
०४	निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांना राहील.
०५	रिकामे टोनर खरेदी करणेबाबतची सिलबंद निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांचे नांवे पाठविणेत याव्यात.
०६	निविदाधारकांनी निविदा मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे दिनांक २४/०८/२०२६ इ. रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने भराव्यात. नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
०७	सदर प्राप्त होणा-या निविदा दिनांक २५/०८/२०२६ इ. रोजी दुपारी २.०० वाजता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांचे निजीकक्षामध्ये उघडणेत येतील. त्यावेळी निविदाधारकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
०८	सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या न्यायालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेकरिता

१. संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सूचित करणेत येते की, सदरील जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या कार्यालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावी.